| |
|---|
| नि.फौ.ख.क्र. ३२७४/२०२२ |
| सरकार वि. मो.जाकीर वगैरे |
| निशाणी क्र. ४३ |

<u>**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ३ यांची शपथेवर सरतपासणी सुरू**</u>

| मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, | | |
|---|---|---|
| नाव | – | आशिष अशोक मानवटकर |
| वय | – | ४३ वर्षे |
| धंदा | – | खाजगी नोकरी |
| राहणार | – | गडडीगोदाम, नागपूर |

<u>**सरतपास सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून**</u>

**१.** मी स्वीगी डीलीवरी बॉय आहे. मी जॉबवरुन परत येत असताना पाहीले होते की, साजीदच्या घरासमोर गर्दी जमली आहे. ते शिवीगाळ करत होते आणि चिडलेले होते. मी घरी गेलो तेव्हा माझ्या बायकोने मला सांगितले की, साजीदचा आणि त्याच्या बायकोमध्ये वाद झाला आहे आणि साजीदच्या बायकोचे नातेवाईक आले होते ते शिवीगाळ करत होते. मी साजीदला बाहेर धावताना पाहीले.

२. घटनास्थळी पोलीस आले होते. पोलीसांनी माझी सही घेतली आणि मला घटनेबाबत सांगितले. साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. मला त्यातील मजकुर माहीत नाही. माझी सही <u>**नि.क्र. ४४**</u> वर आहे.

३. पोलीसांनी माझ्यासमक्ष काही जप्त केले नाही. साक्षीदारास जप्ती पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. मला त्यातील मजकुर माहीत नाही. माझी सही <u>**नि.क्र. ४५**</u> वर आहे.

**सहायक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराला फितुर घोषित करण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजूर.**

**उलटतपास सरकारी वकीलांमार्फत**

२. हे म्हणने खरे आहे की, दिनांक २७.०४.२०२२ रोजी पोलीस घटनास्थळी आले आणि त्यांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. हे म्हणने खरे आहे की, घटनास्थळात नमुद केलेल्या चतु:सिमा बरोबर आहेत. हे म्हणने खरे

नाही की, पोलीसांनी मला साजीदच्या वडीलांच्या घरी, ज्या ठिकाणी कार फोडली त्या ठिकाणी नेले होते. हे म्हणने खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष त्या ठिकाणाची पाहणी केली आणि पंचनामा केला. हे म्हणने खरे आहे की, फिर्यादीच्या घराच्या चतुःसिमा पंचनाम्यात बरोबर नमुद आहेत. हे म्हणने खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला आणि त्यानंतर माझी सही घेतली.

हे म्हणने खरे आहे की, पोलीसांनी माझ्यासमक्ष फिर्यादीकडुन पेनड्राईव्ह जप्त केला होता आणि पोलीसांनी माझी सही घेतली होती. मी पुन्हा सांगतो की, जप्ती पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. जप्ती पंचनामा **नि.क्र. ४६** वर दाखल आहे.

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपी क्र.१ ते ४ तर्फे वकील श्री शेख सबाहत –**

**२.** दिनांक २६.०४.२०२२ रोजी पोलीसांनी माझा जबाब नोंदवला नव्हता. दिनांक २६.०४.२०२२ रोजी पोलीस घटनास्थळी आले नव्हते. पोलीसांनी नोंदवलेल्या जबाबात 'मी घरी गेलो तेव्हा माझ्या बायकोने मला सांगितले की, साजीदचा आणि त्याच्या बायकोमध्ये वाद झाला आहे आणि साजीदच्या बायकोचे नातेवाईक आले होते ते शिवीगाळ करत होते' असे नमुद नाही. पोलीसांनी ते का नमुद केले नाही हे मी सांगु शकत नाही. 'ते चिडलेले होते, तेथे गर्दी झाली होती', असे माझ्या जबाबात नमुद नाही. पोलीसांनी ते का नमुद केले नाही हे मी सांगु शकत नाही. हे म्हणने खरे नाही की, माझे साजीदच्या परीवाराशी चांगले संबंध आहेत. पोलीसांनी घटनेच्या दुस–या दिवशी माझा जबाब नोंदवला होता. घटनेच्या ५–६ दिवसांनंतर माझा जबाब नोंदवला होता असे घडले नाही. हे म्हणने खरे नाही की, तेथे साजीदच्या बायकोचे नातेवाईक चिडलेले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**३.** मला पोलीसांनी किती वाजता बोलावले होते हे सांगु शकत नाही. घटनास्थळी काच मिळुन आली नाही. पोलीसांनी मला पंच म्हणुन नोटीस दिली होती का हे आठवत नाही. हे म्हणने खरे नाही की, मी चतुःसिमेबाबत खोटी साक्ष दिली आहे. हे म्हणने खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष काही जप्त केले नाही आणि पंचनामा बनवला नाही. हे म्हणने खरे आहे की, मला पंचनाम्यातील मजकुर जसाच्या तसा माहीत नाही. पोलीसांनी मला पेनड्राईव्हच्या जप्तीसाठी कधी बोलावले होते हे सांगु शकत नाही. पेनड्राईव्हमध्ये सीसीटीव्ही कॅमेरातील फुटेज होते. सीसीटीव्ही कॅमेरा वालदे यांच्या घरासमोर लावलेला होता. पेनड्राईव्ह कोणत्या कंपनीचा होता ते मला आठवत नाही. हे म्हणने खरे नाही की, पंचनामा नि.क्र. ४६ खोटा आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>**

**<u>फेरतपास काही नाही</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत                                        माझे समक्ष,

नागपूर                                        (श्रीमती. एस.टी. दंडे)
दिनांकः–२१.०३.२०२४                                        मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर